


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३३१, गुरुवार २६ सप्टेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# ४ ऑक्टोबरपासून लंके प्रतिष्ठानचा मोहटादेवी यात्रोत्सव

## ■ सात दिवसांचे नियोजन ■ हजारो महिलांना होणार देवी दर्शनाचा लाभ

पारनेर : प्रतिनिधी

**नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही ४ ते १० ऑक्टोबर दरम्यान मोहटादेवी यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून सात दिवस चालणाऱ्या यात्रोत्सवात पारनेर-नगर मतदारसंघातील हजारो माता भगिनींना मोहटादेवी दर्शनाचा लाभ होणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मा. सदस्या राणीताई लंके यांनी दिली.**

राणीताई लंके यांनी सांगितले की, दरवर्षीचा शारदीय नवरात्रोत्सव आम्हा माता भगिनींसाठी जिव्हाळ्याचा विषय असतो. या पर्वात सत्वाची देवी तसेच नवसाला पावणाऱ्या मोहटादेवीच्या दर्शनाची पर्वणी प्रत्येक महिलेस हवी हवीशी वाटते. वर्षभर घरात राबणाऱ्या माता भगिनींना मोहटादेवीचे मोफत दर्शन व्हावे या भावनेतून खा. नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून मोफत मोहटादेवी यात्रोत्सवाचे गेल्या काही वर्षांपासून आयोजन करण्यात येत आहे. नवरात्रोत्सवात मोहटा देवीच्या दर्शनाचा लाभ होत असल्याने दिवसेंदिवस या यात्रोत्सवाला माता भगिनींचा मोठा प्रतिसाद लाभत आहे. या पार्श्वभुमीवर माता-भगिनींसाठी यंदाही मोहटादेवी दर्शन यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याचे लंके म्हणाल्या.

दि. ४ ऑक्टोबर रोजी हंगे येथे या यात्रोत्सवाचा शुभारंभ होणार असून दि.५ रोजी पारनेर येथील क्रीडा संकुलावरून निघोज व अळकुटी पंचायत समिती गण तसेच पारनेर शहरातील महिलांच्या यात्रेचे प्रस्थान होणार आहे. दि. ६रोजी पारनेरच्या क्रीडा संकुलावरून कान्हूर व जवळा पंचायत समिती गणातील महिला, दि. ७ रोजी टाकळी ढोकेश्वर व कर्जुले हर्या गणातील महिलांच्या बसचे प्रस्थान टाकळी ढोकेश्वर येथून होणार आहे. दि. ८ रोजी भाळवणी येथून ढवळपुरी व भाळवणी गण, दि. ९ रोजी नगर तालुक्याच्या भाग १ तर दि.१० सप्टेंबर रोजी नगर तालुका भाग २ मधील महिलांच्या यात्रेचे प्रस्थान होणार असल्याचे लंके म्हणाल्या.



### खा. लंके यांच्याकडून आढावा

या यात्रेचे नीलेश लंके प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी गावनिहाय नियोजन केले असून मंगळवारी खा. नीलेश लंके यांनी पारनेर येथील संपर्क कार्यालयात यात्रोत्सवाच्या तयारीचा आढावा घेतला. कोणत्या गावात कोणावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे याचीही खातरजमा लंके यांनी केली.

### ४ ऑक्टोबर सुपा गण

सुपा, शहांजापुर, मुंगशी, हंगा, अस्तगांव, रायतळे, वाळवणे, अपधुप, बाबुर्डी, रूईछत्रपती, पिंपरी गवळी, रांजगांव मशीद, भोयरे गांगर्डा

### ४ ऑक्टोबर वाडेगव्हाण गण

वाडेगव्हाण, राळेगणसिध्दी, घाणेगांव, वडनेर हवेली, म्हसणे सुलतानापुर, वाघुंडे बु., वाघुंडे खु., गटेवाडी, जातेगांव, पळवे खु., पळवे बु., नारायणगव्हाण, मावळेवाडी, कुरूंद, यादववाडी, पाडळी रांजणगांव, कडूस. तसेच शिरूर शहरातील पारनेर तालुक्याचे रहिवासी.

### ५ ऑक्टोबर निघोज गण

निघोज, वडनेर बु., गुणोरे, गाडीलगांव, राळेगणथेरपाळ, कोहकडी, म्हसे खुर्द.

### ५ ऑक्टोबर अळकुटी गण

अळकुटी, दरोडी, गारखींडी, कळस, पाडळी आळे, शेरी कासारे, रांधे, लोणीमावळा, पाबळ, म्हस्केवाडी, रेणवडी, चोंभूत, शिरापूर. तसेच पारनेर शहरातील १ ते १७ प्रभागातील महिला.

### दि. ६ ऑक्टोबर कान्हूरपठार गण

कान्हूरपठार, अक्कलवाडी, किन्ही, पिंपळगांव तुर्क, वेसदरे, वडगांव दर्या, जाधववाडी, बाभुळवाडे, पाडळीदर्या, विरोली, हत्तलखिंडी, करंदी, पुणेवाडी, वडझिरे, पिंपरी पठार.

### दि. ६ ऑक्टोबर जवळा गण

जवळा, देवीभोयरे, पिंपरीजलसेन, चिंचोली, गांजीभोयरे, सिध्देश्वरवाडी, पानोली, वडुले, सांगवी सुर्या, पठारवाडी, पिंपळनेर.

### दि. ७ ऑक्टोबर टाकळीढोकेश्वर गण

टाकळीढोकेश्वर, मांडवेखुर्द, देसवडे, खडकवाडी, ढोकी, वडगांव सावताळ, वासुंदे, भोंद्रे, काकणेवाडी, तिखोल, गाजदीपुर.

### दि. ७ ऑक्टोबर कर्जुले हर्या गण

कर्जुलेहर्या, पोखरी, म्हसोबा झाप, वारणवाडी, पळसपुर, काताळवेढा,सावरगांव, नांदुरपठार, पिंपळगांवरोठा, कारेगांव, कासारे, गारगुंडी.

### दि. ८ ऑक्टोबर ढवळपुरी गण

ढवळपुरी, वनकुटे, तास, पळशी, धोत्रे बु., हिवरे कोरडा, काळकुप.

### दि. ८ ऑक्टोबर भाळवणी गण

भाळवणी, माळकूप, वडगांव आमली, भांडगांव, पाडळी तर्फे कान्हूर, गोरेगांव, डिकसळ, जामगांव, सारोळा आडवाई, दैठणे गुंजाळ, लोणी हवेली.

### दि. ९ ऑक्टोबर नगर तालुका भाग १

देहरे, नांदगांव, शिंगवे नाईक, इस्लामपुर, पिंप्री घुमट, वडगांव गुप्ता, हमीदपुर, हिंगणगांव, खातगांव टाकळी, हिवरे बाजार, विळद, निमगांव घाणा, कर्जुने खारे, नव नागापुर, निंबळक, इसळक, नेप्ती, निमगांव वाघा, जखणगांव.

### दि. १० ऑक्टोबर नगर तालुका भाग २

सारोळा कासार, घोसपुरी, हिवरे झरे काळेवाडी, बाबुर्डी बेंद, बाबुर्डी घुमट, देउळगांव सिध्दी, अरणगांव, भोरवाडी, सोनेवाडी, आकोळनेर जाधववाडी, खडकी, खंडाळा, भोयरे पठार, पिंपळगांव कौडा, वाकोडी, भोयरे खुर्द, चास, कामरगांव, पिंपळगांव वाघा.

# नगरमध्ये शड्डू ठोकण्याचे संदीप कोतकरांचे संकेत!

## ■ स्पंदन प्रतिष्ठाणच्या माध्यमातून शक्तीप्रदर्शन ■ फेसबुकच्या माध्यमातून साधला संवाद

नगर : विशेष प्रतिनिधी

**नगर शहरात महापौरपदाच्या माध्यमातून आपल्या कामाचा ठसा उमटविणारे संदीप कोतकर हे आगामी विधानसभा निवडणूकीत नगर शहर मतदारसंघातून शड्डू ठोकण्याच्या तयारीत असल्याचे संकेत मिळत आहेत. गणेशोत्सवाच्या निमित्ताने विसर्जन मिरवणूकीदरम्यान करण्यात आलेले शक्तीप्रदर्शन तसेच अलिकडेच फेसबुकच्या माध्यमातून नगरकरांशी**

पारनेर दर्शन Special

**साधलेला संवाद हा संदीप कोतकर हे नगर शहराच्या राजकारणात पुन्हा सक्रिय होणार असल्याचाच एक भाग असल्याचे मानले जाते आहे.**

गेल्या दहा वर्षांपासून कोतकर यांचे साडू संग्रामभैय्या जगताप हे नगर शहराचे विधानसभेत प्रतिनिधीत्व करत आहेत. शहरावर त्यांनी त्यांची पकडही बसविलेली आहे. अशा स्थितीत त्यांचा प्रतिस्पर्धी कोण ? याची नेहमीच चर्चा होत असताना अचानकपणे संदीप कोतकर यांच्या नावाची चर्चा सुरू झाल्याने नगर शहराचे राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. दोघा साडूंची लढत झाली तर ती रंगतदार होईल असेही बोलले जात आहे.

स्पंदन प्रतिष्ठाणच्या शक्तीप्रदर्शनानंतर संदीप कोतकरांनी फेसबुकच्या माध्यमातून नगरकरांना साद घातली असून त्यांनी मार्गी लावलेली कामे व प्रलंबित असलेली विकास कामे यांचा उल्लेख करीत पुन्हा एकदा नगरकरांच्या सेवेत हजर होण्याचा मनसुबा त्यांनी व्यक्त केला आहे.



### आता बोलायची वेळ आलीय !

फेसबुकच्या संवादात कोतकर म्हणतात, गेली अनेक दिवसांपासून माझ्या वैयक्तिक अडचणींमुळे आपल्याशी हितगुज करू शकलो नाही. परंतू आता वेळ आलीय बोलायची. म्हणून आपल्याशी हितगुज करतोय. नगर शहर विकसित व्हावं, शहराचे रूपडे बदलावे हे स्वप्न मी पाहिलं. महापौरपदाच्या काळात केडगांववासियांचा अत्यंत जिव्हाळ्याचा पाणी प्रश्न, केडगांव पाणी योजना, शहर पाणी योजना, शहरातील रस्ते, आरोग्य सेवा आणि नागरी सुविधांमध्ये सुधारणा करण्यात आपल्या पाठबळामुळे काही प्रमाणात का होईन यश आले. याचे साक्षीदार तुम्ही आहातच असे कोतकर यांनी फेसबुकच्या पोस्टमध्ये सुरूवातीलाच नमुद केले आहे.

### पुणे,नाशिकच्या बरोबरीने नगरला न्यायचंय

अजूनही नगर शहरात विकासाची कामे करण्याजोगे खूप काही आहे. तरूणांच्या हाताला रोजगार, महिलांची सुरक्षितता, शिक्षणासाठी सोयी सुविधा, पाणी, आरोग्य, उच्च शिक्षण, एमआयडीसी उद्योगधंदे यावर काम करणे मला आवश्यक वाटते. नगर शहर विकासित व्हावं यासाठी मनापासून खुनगाठ बांधलीय. पण नगर शहराच्या बाबतील पाहिलेलं स्वप्नं काहीसं मागे पडलंय. आपल्याशी हितगुज करताना मनाला खुप वेदना होतायेत. पण आपल्या शहराला पुणे, नाशिकच्या बरोबरीने का होईना ही मनोमन इच्छा आहेच असे नमुद करीत कोतकर यांनी भविष्यातील नगरच्या विकासाचे संकल्पचित्र उभे केले आहे.

### आता थांबणार नाही, मागे हटणार नाही !

महापौरपदाच्या काळात शहराच्या विकासासाठी नगरकरांनो मला लाख मोलाची साथ दिलीत. तुम्ही दिलेली साथ माझ्या आयुष्यात विसरणं कदापीही शक्य नाही. नगरकरांशी जोडलेली माझी नाळ आजही कायम आहे. त्यात थोडासाही बदल झालेला नाही, आणि होणारही नाही. गणपती विसर्जनाच्या वेळी माझ्या एका आवाहनावर तुम्ही हजारोंच्या संख्येने स्पंदन प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित गणपती विसर्जन मिरवणूकीत सहभाग घेतला. आणि गणपती बाप्पाच्या ऐतिहासिक मिरवणूकीचे साक्षीदार झालात. हीच गणपती विसर्जनाची भव्य मिरवणूक नगर शहराला वेगळी दिशा देणारी ठरणार आहे. माझ्यावर आपले असलेले अतूट प्रेम या मिरवणूकीत दिसून आले. अन् हृदय भरून आले. नगरकरांनो आपण माझ्यावर दाखविलेला विश्वास हा कदापीही तुटू देणार नाही हा माझा तुम्हाला शब्द असल्याचे सांगत पुढे कोणी जात असेल तर त्याला मागे ओढण्याचा प्रयत्न केला जातो. तसाच काहीसा प्रयत्न माझ्या बाबतीतही केला जातोय. पण आता मी थांबणार नाही, मागे हटणार नाही, नगरकरांना दिलेला शब्द, शहर विकासाचं पाहिलेलं स्वप्न पुर्ण करण्यासाठी मागे हटणार नाही असा शब्द कोतकर यांनी पोष्टच्या अखेरीस दिला आहे. शहराच्या विकासावर आपण नंतर बोलूच असे सांगत सत्य परेशान हो सकता है, लेकिन पराजित नही असा संदेश देत कोतकर यांनी आपल्या संदेशाला पुर्णविराम दिला आहे.

# तन्वीच्या अकाली निधनाने तालुका हळहळला

## शोकाकूल वातावरणात वाघुंड्यात अंत्यसंस्कार

वाघुंडे : प्रतिनिधी

**वाघुंडयाचे मा. सरपंच संदीप मगर यांची कन्या तन्वी संदीप मगर हिचे अल्पशा आजाराने मंगळवारी सायंकाळी निधन झाले. इयत्ता दहावीमध्ये शिकणाऱ्या तन्वीच्या अकाली निधनामुळे अवघा तालुका हळहळला.**



तन्वी ही काही दिवसांपूर्वी एका आजाराने त्रस्त होती. त्यावर शस्त्रक्रिया झाल्यानंतर तीने या आजारावर मात केली होती. मंगळवारी सायंकाळी तीला त्रास होऊ लागल्याने सुपा येथील खाजगी रूग्णालयात तन्वी हीस दखल करण्यात आले होते. सुपा येथील डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार तन्वीस नगर येथे पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान तन्वीचा मृत्यू झाला.

बुधवारी सकाळी शोकाकूल वातावरणात तन्वी हीच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. खा. नीलेश लंके यांच्यासह त्यांचे अनेक सहकारी यावेळी उपस्थित होते.

# निघोजमध्ये राष्ट्रवादीची शिवस्वराज्य यात्रा

## शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता आयोजन जयंत पाटील, अमोल कोल्हेंची उपस्थिती

निघोज : प्रतिनिधी

**आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने राज्यात काढण्यात आलेली शिवस्वराज्य यात्रा शुक्रवार दि.२७ सप्टेंबर रोजी निघोजमध्ये पोहचणार आहे. यात्रेनिमित्त शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता मळगंगा मंदिर देवस्थानच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या या सभेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मा. सदस्या राणीताई लंके यांनी दिली.**

पाच वर्षांपूर्वी खा. नीलेश लंके यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर काढण्यात आलेल्या यात्रेचेही निघोज येथेच आयोजन करण्यात आले होते. या




सभेमध्ये लंके यांच्या निवडणूकीसाठी अनेकांनी मदतीचे धनादेश मान्यवरांकडे सुपूर्द केले होते.

यंदा नीलेश लंके हे लोकसभेमध्ये पोहचले असून त्यांच्या पत्नी राणीताई लंके या विधानसभेच्या संभाव्य उमेदवार आहेत. निवडणूकीच्या अनुषंगाने राणीताई लंके यांनी तयारीही सुरू केली असून त्यांच्याच मार्गदर्शनाखाली सध्या मतदारसंघात ब्रेस्ट कॅन्सर तपासणी तसेच रक्तदान शिबिरांचे आयोजन पंचायत समितीच्या गणनिहाय करण्यात आले आहे. या शिबिरांना महिला तसेच रक्तदान करणाऱ्या तरूणांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभुमीवर नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने महिलांसाठी मोफत मोहटादेवी यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून दि. ४ ते १० ऑक्टोबरदरम्यान ही यात्रा संपन्न होणार आहे. शिवस्वराज्य यात्रोत्सवानिमित्त शुक्रवारी आयोजित करण्यात आलेल्या सभेसाठी खा. नीलेश लंके यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस व नीलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सदस्य उपथित राहणार असून मतदारसंघातील नागरीकांनी सभेस मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राणीताई लंके यांनी केले आहे.



# तंत्रमंत्र

## विज्ञानयुगातील बितंबातम्या

**ई-मेल, एसएमएस, फेसबुक, व्हॉट्स अॅप... जग जवळ आल्याने एका क्लिकने संपर्क साधणं सहज होतंय. ऑफिसची कामं अनेकदा प्रत्यक्ष उपस्थितीपेक्षा ई-मेल, व्हॉट्स अॅपवर फॉर्वर्ड होऊ लागली. प्रसंगी दहा दहा किंवा जास्त मंडळीही फोनवरच 'मीटिंगा' आटपायला लागली. झटपट निर्णय घेणे, कामाला गती येणं, त्यातून खूप चांगल्या, उपयुक्त गोष्टी घडणं होऊ लागलं. व्यावहारिक जगात या सगळ्याच संपर्कसाधनांनी खूप मोठा बदल घडवला. त्यामुळे एका बाजूला विकास घडत आहे, पण त्याहीपेक्षा मोठी उलथापालथ होते आहे ती मानवी नातेसंबंधात! त्यातली एक म्हणजे जोडीदारांमधील दुरावा. गेल्या काही महिन्यांत मोबाइल, सोशल नेटवर्किंगमुळे दुरावा आलेल्या जोडप्यांच्या प्रमाणात वाढ होऊ लागलीय. हे वापरणाऱ्यांनी वेळीच स्वतःवर निर्बंध घालणं हे कुटुंबाच्या सौख्यासाठी महत्त्वाचं आहे...**



# 'लाइक्स'चा व्हायरस


कामाच्या व्यापात महिनोन्‌महिने भेटायला तर सोडाच फोनवर बोलायलाही न मिळालेली नाती व्हॉट्स अॅप, फेसबुकमुळे रोजच्या रोज संपर्कात राहू लागली. अनेक वर्षे न भेटलेल्या शाळा, कॉलेजमधल्या मित्र-मैत्रिणींच्या अखंड नात्याच्या झरा पुन्हा खळखळून वाहू लागला, तर दुसऱ्या बाजूला नवी नाती निर्माण झाली. ई-मेल आयडी, मोबाइल नंबरची देवाणघेवाण नात्याला वेगळं वळण देऊ लागली. एका 'लाइक'ने नात्याला वेगळं परिमाण मिळू लागलं, मुख्य म्हणजे डिलीटचं बटण 'प्रायव्हसी' अबाधित ठेवू लागलं. नात्यात आणि म्हणूनच मग भाषेतही जरा मोकळेपणा.. मग जरा जास्तच मोकळेपणा आला. 'लव्ह यू' शब्द 'डीअर'च्या पंक्तीत बिनदिक्कत जाऊन बसला. व्यक्तिगत आयुष्य, व्यक्तिगत प्रश्नाचं शेअरिंग नात्याला घट्ट करत गेलं... काळाच्या ओघात जे नवऱ्याकडून वा बायकोकडून अपेक्षित होतं ते मित्राकडून वा मैत्रिणीकडून अपेक्षिलं जाऊ लागलं. आयुष्य पुन्हा एकदा हवंहवंस वाटू लागलं. नवरा-बायकोच्या नात्यातील कसर दुसऱ्या नात्याने भरून जायला लागली. घरातल्या घरात दोन स्वतंत्रपणे जगणारी, स्वतःची 'स्पेस' सांभाळणारी बेटं तयार झाली. आपल्याच आयुष्यात रमणारी! त्यातून एका बाजूला प्रेमाचं नातं तर काही ठिकाणी आपल्या जोडीदाराबद्दल संशयाचं, उपेक्षेचं नातं निर्माण झालं. काही वेळा राईचा पर्वत केला गेला आणि यातूनच निर्माण झाले गुंते.. काहींनी विवेकाचा वापर करत तिथेच थांबायचा... नात्याला वेगळं रूप न द्यायचा निर्णय घेत माघार घेतली. काहींनी नीट 'हॅण्डल' केलं प्रकरण! पण काही गुंते मात्र इतके वाढले की समुदेशकांपर्यंत पोहोचले.



## सहवास आहे पण संवाद नाही!

हल्लीच्या वेगवान आयुष्यात कुटुंबाला, एकमेकांना द्यायलाच आधी वेळ कमी मिळतो. त्यात पूर्वी या सोशल साइटस्‌ फक्त इंटरनेटद्वारे संगणकावर उघडता यायच्या. घरात एकच संगणक, त्यामुळे घरी दमून आल्यावर संगणक उघडून चॅटिंग करण्याचा उत्साह तुलनेत कमी असायचा. पण आता स्मार्टफोन, टॅब, आयपॅडवरही निःशुल्क अॅप्स मिळत असल्यानं संपर्क अहोरात्र सहज करता येऊ लागला. किंबहुना तुम्ही सतत ऑनलाइन असता आणि म्हणूनच सतत दुसऱ्यांच्या नजरेखालीही असू शकता. तुम्ही इंटरनेट कनेक्शन बंद केलं तरच तुमचा संपर्क तुटतो. म्हणूनच हल्ली अनेकांचा दिवस एकमेकांना गुड मॉर्निंग स्माइली पाठवून सुरू होतो आणि गुड नाइटच्या स्माइलीने संपतो. पण विरोधाभास असा की इतरांना या 'स्माइली' पाठविताना बेडरूममध्ये असलेल्या आपल्या जोडीदाराला मात्र प्रत्यक्षात 'गुड मॉर्निग', 'गुड नाइट' फारच अभावानं म्हटलं जातं, म्हणजेच सहवास आहे, पण संवाद नाही! तो संवादच महत्वाचा, कारण आयुष्य सतत स्माइली (आनंदी) नसतं. कुटुंबातील, व्यक्तिगत जीवनातील अनेक निर्णय एकमेकांशी चर्चा, वाद-विवाद करून घ्यावे लागतात, पण या सततच्या चॅटिंग, ऑनलाइन राहण्यानं साधे-मोठे निर्णय घेताना पूर्ण लक्ष नसतंच, मग त्यांच्या जोडीदाराची चिडचिड व्हायला लागते.

## चॅटपूर्वी या गोष्टी कराच...



- सोशल नेटवर्किंगसाठीची वेळ निश्चित करा व ती पाळा.
- व्यक्तिस्वातंत्र्य, नात्यात दिलेली स्पेस, मान्य करूनही जोडीदारांतील एकमेकांचा विश्वास टिकविण्यासाठी आपले मित्र- मैत्रिणी एकमेकांना सांगा व फॅमिली फ्रेंड बना. गैरसमज टाळता येतात.
- मित्रपरिवाराशी चॅटिंग करताना आणि ती पोस्ट करताना एक क्षण थांबून विचार करा. त्यातून गैरसमज होणार नाही ना!
- इतका मोकळेपणा ठेवूनही जोडीदारापैकी कुणाला एखाद्याशी चॅटिंग करणे पसंत नसेल तर कुटुंबातली नाती टिकविण्यासाठी चॅटिंगचा अट्टहास हवाच का याचा गंभीरतेने विचार करा.
- नात्यातील बदलांना सामोरे जाताना भावनिक विचार न करता विवेकी विचारांनी वागून जोडीदारांशी प्रत्यक्ष संवाद वाढवून नाती व विश्वास अधिक बळकट करा.



# लिफ्टचा वापर करताना...

**लिफ्ट वापरताना साध्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केल्यास सुरक्षिततेची खात्री देता येऊ शकते. त्यासाठी लिफ्टचा योग्यप्रकारे वापर कसा करावा, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे, शिवाय लिफ्ट बंद पडल्यानंतर काय करावे, हेसुद्धा जाणून घेणे आवश्यक आहे...**

### महत्त्वाच्या सूचना...

तुमचे गंतव्यस्थान निश्चित करा. तुम्हाला ज्या दिशेने जायचे आहे, त्याकरिता लिफ्टला बोलावण्याचे बटन एकदाच दाबा. लिफ्ट येत आहे, यासंदर्भातील सिग्नल पाहा किंवा ऐका. लिफ्टमधून बाहेर पडणाऱ्या प्रवाशांकरिता मार्ग मोकळा ठेवा. जर आलेली लिफ्ट भरलेली असेल, तर दुसऱ्या लिफ्टची वाट पाहा. हात, पाय, काठी इत्यादींसारख्या व इतर कोणत्याही वस्तूसह लिफ्टचे बंद होणारे दरवाजे थांबवण्याचा प्रयत्न करू नका. दुसऱ्या लिफ्टची वाट पाहा. काळजीपूर्वक लिफ्टमध्ये प्रवेश करा व बाहेर पडा. दरवाजाजवळ उभे असलेल्या प्रवाशांनी प्रथम प्रवेश करावा किंवा बाहेर पडावे. आत आल्यानंतर, त्वरित तुम्हाला ज्या मजल्यावर जायचे आहे, त्याकरिता बटन दाबावे आणि दुसऱ्या प्रवाशांकरिता मार्ग मोकळा करण्याकरिता मागील बाजूस सरकावे. लहान मुले व पाळीव प्राण्यांना घट्ट धरा. कपडे व सामान लिफ्टच्या दरवाज्यापासून दूर ठेवत सुरक्षित अंतर ठेवा. लिफ्टचा दरवाजा उघडाच ठेवण्याकरिता डोअर ओपन बटन दाबून धरून ठेवा किंवा दुसऱ्या कोणा व्यक्तीला बटन धरून ठेवण्याकरिता सांगा.

### लिफ्टमध्ये अडकले तर...

लिफ्ट तंत्रज्ञांकडून साहाय्य प्राप्त करण्याकरिता अलार्म बटन दाबा. जे लिफ्टमधून बाहेर पडण्यास प्रवाशांना मदत करतील. जर लिफ्टमधील कंट्रोल्समधून संवाद साधण्याकरिता कोणताच मार्ग उपलब्ध नसेल तर लिफ्टमध्ये दर्शविण्यात आलेल्या इमर्जन्सी क्रमांकावर संपर्क साधण्याकरिता मोबाइल फोनचा वापर करा. लिफ्ट तंत्रज्ञांशी बोलताना, त्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करा. यामुळे लिफ्टमधून बाहेर पडण्याच्या प्रक्रियेला गती मिळण्यास मदत होईल. जबरदस्तीने लिफ्टचे दरवाजे उघडण्याचा प्रयत्न करू नका. लिफ्टमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करू नका. शांत राहा आणि मदतीची वाट पाहा.

### हे करू नका...

जाणकार नसलेल्या व्यक्तीने लिफ्टमध्ये अडकलेल्या प्रवाशांची सुटका करण्याचा प्रयत्न करू नये. लिफ्टमध्ये अडकलेल्या प्रवाशांची सुटका करणे, ही पात्र तंत्रज्ञांची जबाबदारी आहे. फ्रंट दरवाजापासून दूर राहा आणि सूचना मिळत नाही तोपर्यंत कोणत्याही बटनाला स्पर्श करू नका.

### लक्षात ठेवण्याच्या महत्त्वपूर्ण बाबी...

१ लिफ्टला जोडण्यात आलेली दोरी तुटणार नाही याची काळजी घ्यावी.

२ लिफ्टला एकापेक्षा अधिक दोरी किंवा बेल्ट जोडण्यात यावेत.




### हे करा व हे करू नका...

भूकंप, विजा चमकणे, पूर, आग लागली असेल तर लिफ्टचा वापर करू नका. या घटना घडत असताना जिन्याचा वापर करा. कारण या घटनांमुळे इलेक्ट्रिकल सेवेमध्ये अडथळा निर्माण होऊ शकतो. लोड मर्यादा व प्रवासी क्षमता मर्यादेचे काटेकोरपणे पालन करा. जबरदस्तीने लिफ्टचे दरवाजे उघडू नका. लिफ्टमधून जात असताना लहान मुलांसोबत प्रौढ व्यक्तीने असणे गरजेचे आहे. लिफ्ट कार व हॉल यांच्यामध्ये असलेल्या पोकळीमध्ये कोणत्याही वस्तू टाकू नका.

### लिफ्टमधून जात असताना...

लिफ्टच्या दरवाजांपासून दूर उभे राहा. उपलब्ध असल्यास रेलिंग धरून ठेवा. मजल्यांचे संकेत देणाऱ्या सूचनांकडे लक्ष ठेवा आणि तुमचे गंतव्यस्थान येताच लिफ्टमधून बाहेर पडण्याकरिता सज्ज राहा. लिफ्ट थांबल्यानंतर दरवाजा उघडला नाही, तर डोअर ओपन बटन दाबा. तरीदेखील जर दरवाजा उघडला नाही, तर अलार्म बटन दाबा किंवा टेलिफोन किंवा इंटरकॉमचा वापर करा. योग्य व्यक्ती तुम्हाला मदत करण्यास येईपर्यंत वाट पाहा.

# सोप्या पद्धतीनं करा फोटो एडिटिंग



**एक काळ असा होता जेव्हा फोटोज काढण्यासाठी कॅमेरे मग त्यात रोल आणि कितीतरी गोष्टी लागायच्या. पण एका स्मार्टफोनमुळे हे सारंकाही बदललं. आता कुठेही आपण असलो तरी फोटोसाठी मोबाईल फोनच वापरतो. स्मार्टफोनमुळे फोटो काढणं आणि ते शेअर करणं फारच सोपं झालं आहे. आता तुम्हालादेखील जर इन्स्टाग्राम, फेसबुक इत्यादी प्लॅटफॉर्मवर फोटो शेअर करायला आवडत असतील, तर तुमचे फोटो तसेच भारी दिसावेत असं तुम्हाला वाटत असेल, तर काढलेले फोटो आणखी भारी दिसावेत यासाठी त्यांना एडिट करतात. आता मार्केटमध्ये असणारे सोपे काही फोटो एडिटर अॅप तुम्हाला सांगणार आहोत.**

### Picsart

मोबाईलमध्ये मोठ्या प्रमाणात फोटोला एडिट करण्यासह अनेक फोटोंचं कोलाज बनवण्यासाठी हे Picsart AI Photo Editor अॅप वापरतात. हे प्ले स्टोअरवरून कोट्यवधीवेळा डाउनलोड केले गेले आहे. फोटो एडिटिंगसाठी या अॅपमध्ये बऱ्याच खास गोष्टी आहेत. यात तुम्ही फोटोसह फोटो इफेक्ट्स आणि फिल्टर्सचा वापर करून पाहू शकता. तसेच, तुम्ही बॅकग्राउंडही बदलू शकता.

### Snapseed

खास करून गुगलचंच हे एक उत्कृष्ट फोटो एडिटिंग अॅपआहे. हे अॅप व्यावसायिक वापरकर्त्यांसाठी अधिक उपयुक्त आहे. या अॅपला Google Play Store वरून ते १०० दशलक्षाहून अधिक वेळा डाउनलोड केले गेले आहे. या अॅपच्या मोबाईलचा मोबाईल एडिटिंग इंटरफेस अतिशय सोपा आहे, ज्यामुळे तो फोटोग्राफर आणि एडिटिंग करणाऱ्यांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे.

### PhotoShop

जेव्हा फोटो एडिटिंगचाविषय निघतो तेव्हा Adobe फोटोशूट प्रामुख्याने आठवतं. मोठ्या लेव्हलला एडिटिंग फोटोशॉपने होत असून याचं मोबाईल व्हर्जनही आहे. वापरायला सोपं पण सोबतच दमदार फीचर्ससह हे अॅप येत असून गुगल प्ले स्टोअरवरून ते लाखाहून अधिक वेळा डाउनलोड केले गेले आहे.

### Pixlr

Pixlr हे देखील एक भारी आणि लोकप्रिय फोटो एडिटिंग अॅप आहे. हे गुगल प्ले स्टोअरवरून ५० दशलक्ष वेळा डाउनलोड केले गेले आहे. हे विनामूल्य आणि सशुल्क अशा दोन्ही व्हर्जनमध्ये येते. Pixlr ची विनामूल्य आवृत्ती फिल्टर आणि काही मूलभूत फीचर्सचा वापर करु देते. तर पेड व्हर्जनमध्ये आणखी भारी फीचर्स दिले गेले आहेत.

### Adobe Photoshop Lightroom

एकीकडे Adobe चं फोटोशॉप अॅप असताना Adobe Photoshop Lightroom देखील एक भारी आणि पावरफुल फोटो आणि व्हिडिओ एडिटिंग अॅप आहे. Google Play Store वरून ते १०० दशलक्षाहून अधिक वेळा डाउनलोड केले गेले आहे. यामध्ये तुम्ही इमेज एडिटर आणि फोटो फिल्टर्स देखील वापरू शकता.

# खतरनाक व्हॉट्स अॅप पिंक व्हायरस; इन्स्टॉल करताच मोबाइल हॅक

**व्हॉट्स अॅप पिंक व्हायरस पुन्हा एकदा सक्रिय झाला आहे. व्हायरल होणाऱ्या लिंकमधून व्हॉट्स अॅपचे नवे व्हर्जन इन्स्टॉल करण्यास सांगितले जाते व क्षणार्धात सायबर गुन्हेगार तुमचा मोबाइलच हॅक करतात. व्हॉट्स अॅपला सातत्याने अपडेट येतात. मात्र, गेल्या काही दिवसांपासून या व्हॉट्स अॅपच्या नवीन व्हर्जनची लिंक फॉरवर्ड होण्यास सुरुवात झाली आहे. यात अॅपचा हिरवा रंग बदलून गुलाबी रंगात बदलतो, असे सांगून वापरकर्त्यांना आकर्षित केले जाते. तज्ज्ञांच्या मते, एका विशिष्ट कालावधीनंतर अशा व्हॉट्स अॅप लिंक व्हायरल होत आहेत. परंतु त्या पूर्णपणे खोट्या आहेत. २०२१ मध्ये सर्वप्रथम व्हॉट्स अॅप पिंक हा व्हायरस इंटरनेटच्या जगतात आला. तेव्हाही राज्यभरात हजारो नागरिक याला बळी पडले होते.**

### इन्स्टॉल केल्यास नेमके काय होते ?

व्हॉट्स अॅप पिंक लिंक सध्या फिरत आहे. सोशल मीडियावर स्क्रोल करतानादेखील तुम्हाला त्याची जाहिरात प्राप्त होऊ शकते. त्यावर क्लिक करताच तेथून तुम्हाला लिंक अनोळखी संकेतस्थळावर घेऊन जात एपीके फाइल इन्स्टॉल करण्यास सांगते. त्याद्वारे अॅप इन्स्टॉल होताच मोबाइलमधील संपर्क क्रमांक, फाइल मॅनेजर, व्हॉइस, लोकेशनची परवानगी मागते. सहसा वापरकर्ते ते सर्व मान्य करत पुढे जातात व काही क्षणात तुमच्या मोबाइलचा ताबा पूर्णपणे सायबर गुन्हेगारांच्या हाती जातो.

### तुमच्या माहितीचा अनेक मार्गाने होतो वापर

- मोबाईलमधील संपर्क क्रमांक, त्यातील होणाऱ्या चर्चा, ग्रुपचे नावे आदी माहिती डेटा म्हणून वापरला जातो. तो सायबर जगतात लाखो रुपयांना विकला जातो.
- मोबाईल हॅक केल्यानंतर तुम्ही करत असलेले ऑनलाईन व्यवहार हेरून पैसे लंपास केले जाऊ शकतात.
- बदनामीसाठी हे प्रयोग होतात. त्यातून तुमच्या नावाने कुठलाही गैरप्रकार, चुकीचे मेसेज पाठवले जातात.
- कुठलेही अॅप इंस्टॉल करताना ते मोबाईल ऑपरेटिंग सिस्टीमच्या अधिकृत अॅपमधूनच इंस्टॉल करा. त्याच्या खालील त्याचा रिव्ह्युव्हज आवर्जुन वाचा.




### चूक झाल्यास...

चुकून असे अॅप, लिंक इंस्टॉल झाल्यास तत्काळ ते अॅप अनइन्स्टॉल करा, व्हॉट्स अॅप पिंक अॅप हे हाईड होऊन जाते. ते हाईड झाल्यास मोबाईल सेटिंग-अॅप्स या पर्यायात जाऊन या नावाचे अॅप काढून टाका. सर्व अॅपला दिलेल्या परवानग्या (परमिशन) रिमूव्ह करा. सेटिंगमध्ये जाऊन ब्राऊजर कॅचे क्लिअर करा.

## शॉर्ट न्यूज

### सुरेश आसने पवार गटाच्या तालुका उपाध्यक्षपदी

■ **कोपरगाव :** तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कोपरगाव तालुका उपाध्यक्षपदी ब्राम्हणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते सुरेश आसने यांची नियुक्ती करण्यात आली. तसे नियुक्तीपत्र सुरेश आसने यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश प्रवक्ते व जिल्हा कार्याध्यक्ष संदीप वर्षे, तालुकाध्यक्ष बापू रांधवणे यांच्याहस्ते देण्यात आले. संघटन वाढवण्यासाठी शहरी भागासह ग्रामीण भागातील सामाजिक कार्यकर्ते व तरुण वर्गातील कार्यकर्त्यांना एकत्र करून मोठ्या प्रमाणात संघटन वाढवण्याचे काम आम्ही करतो.

### गुन्हा दाखल असलेल्या आरोपीला अटक करा

■ **नेवासा :** येथे अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधात्मक कलमान्वये गुन्हा दाखल असलेल्या आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी सकल मातंग समाजाच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले. यावेळी भारतीय दलित महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुनील उमाप, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष विजयराव वडागळे, आशिष शेलार, नवनाथ शेलार, प्रेम गाडे, हिनाबाई उबाळे, सत्यजित शिंदे, बाबासाहेब शेलार, विजय वडागळे आदींसह समाजबांधव उपस्थित होते.

### आयुक्तांच्या डेंगू मुक्त अभियानाला यश

■ **नगर :** महापालिकेच्या माध्यमातून नागरिकांच्या हिताचे निर्णय घेतले जात असून पावसाळ्यामध्ये साथीचे आजार पसरत असल्याकारणाने आरोग्याच्या दृष्टीने समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी डेंगू मुक्त अभियानाचा दहावा रविवार संपन्न झाला असून नागरिकांच्या घरापर्यंत जाण्याचे काम केले असून डेंगू निर्मितीपाणीसाठे नष्ट केली याचबरोबरउपयोजना करत औषध फवारणी केली त्यामुळे मागील वर्षीपेक्षा यावर्षी डेंगू रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात घट झाली असून डेंगू मुक्त अभियानाला यश आले. असल्याची माहिती आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.

### देवतळ्याच्या मंदिरात चोरट्यांचा धुमाकूळ

■ **संगमनेर :** तालुक्यातील देवगाव शिवारातील देवतळे येथील खंडोबा मंदिरात चोरीची घटना घडली. मंदिरातील पितळी चार घंटा तसेच देवाला भाविकांनी अर्पण केलेल्या अश्व आणि श्वान यांच्या चांदीच्या प्रतिकृती असा अंदाजे ६०हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला. हीघटना सोमवारी (दि. २३) रात्री ८: ३० च्या सुमारास घडली. देवगाव हद्दीत देवतळे येथे प्रति दावडी अशी ख्याती असलेले खंडोबाचे मंदिर आहे. शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या या मंदिरात सोमवारी रात्री ८: ३० वाजेच्या सुमारास दोन चोरट्यांनी प्रवेश केला.

### श्रीगोंदा पंचायत समितीस टक्केवारीचे ग्रहण

■ **श्रीगोंदा :** तालुक्यातील पंचायत समितीच्या गलथान कारभाराचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. मात्र, प्रशासनाला याचे काहीच घेणे - देणे उरले नसून प्रत्येक कामात चिरीमेरीची मागणी होत असल्यामुळे श्रीगोंदा पंचायत समिती टक्केवारीवर चालतेय याचा जाब विचारण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांच्या कार्यकर्त्यांनी गटविकास अधिकारी यांना घेराव घातला होता.श्रीगोंदा पंचायत समितीच्या सर्वच विभागात नागरिकांची मोठ्या प्रमाणात हेळसांड करून लूटमार सुरू असल्याच्या अनेकतक्रारी नागरिकांनी केल्या असून, किरकोळ कामासाठी चिरीमेरी मागितली जात आहे.

# आता दुधाला मिळणार प्रतिलिटर ३५ रुपये दर !

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती



**शिर्डी : प्रतिनिधी**

**राज्यातील सहकारी व खासगी दूध प्रकल्पांना दूध पुरवठा करणाऱ्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना दुधाला योग्य भाव मिळावा यासाठी शासनाकडून दिल्या जाणाऱ्या अनुदानात २ रुपयांनी वाढ केली असून आता शेतकऱ्यांना प्रतिलिटर मागे ७ रुपये अनुदान दिले जाणार आहे. वाढीव अनुदान योजनेमुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांना यापुढेही प्रतिलिटर ३५ रुपये दर मिळणार असल्याची माहिती पशु संवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.**

दूध उत्पादकांच्या अडचणी पाहता, दुधाला वाढीव भाव मिळावा यासाठी मंत्री विखे पाटील यांनी सातत्याने प्रयत्न करत आहेत. या अगोदर त्यांनी प्रतिलीटर ५ रुपये अनुदान देवून दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा दिला होता. पण आंतरराष्ट्रीय बाजारातील दुधाची भुकटी आणि बटरचे दर अद्यापही स्थिरावले नसल्याने परिणामी राज्यात दुधाला योग्य दर मिळणे कठीण झाले आहे. त्यात शासनाची अनुदान योजना ३० सप्टेंबर पर्यंत चालू राहणार होती. यामुळे दूध उत्पादक शेतकरी पुन्हा आर्थिक अडचणीत आला असता.म्हणून दूध उत्पादक शेतकऱ्यांनी मंत्री विखे पाटील यांच्याकडे अनुदान योजनेला मुदतवाढ आणि अनुदानात वाढ करण्याची मागणी केली होती.

त्यानुसार मंत्री विखे पाटील यांनी सोमवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत दूध अनुदान योजनेला मुदतवाढ आणि ७ रुपये अनुदान देण्याचा प्रस्ताव आणला. या प्रस्तावाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली. महायुती सरकारने दूध उत्पादक शेकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतल्यामुळे मंत्री विखे पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच सर्व मंत्रिमंडळाचे आभार व्यक्त केले.

शासनाने दूध अनुदान योजनेला वाढ दिली असून वाढीव अनुदान योजनेचे पैसे १ ऑक्टोबर पासून शेतकऱ्यांच्या खात्यात थेट वर्ग केले जाणार आहेत. दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध संघांनी १ ऑक्टोबर २०२४ पासून २८ रुपये प्रतिलिटर इतका दर देणे बंधनकारक राहणार आहे. त्यानंतर शेतकऱ्यांना शासनामार्फत ७ रुपये प्रतिलिटर त्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात येतील. सदर निर्णयामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# नगर शहरांमध्ये लवकरच २० इलेक्ट्रिक बस धावणार

## आमदार संग्राम जगताप यांची माहिती



**नगर : प्रतिनिधी**

**नगर एमआयडीसी मधील कामगारांचा सुरक्षित प्रवास करता यावा यासाठी उद्योजकांनी बस सेवा सुरू करण्याची मागणी केली होती तसेच एमआयडीसी मधील कामगारांसाठी सिटी बस सेवा सुरू केली आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून लवकरच २० इलेक्ट्रिक बस नगर शहरांमध्ये धावणार आहेत.**

केडगाव येथे बस डेपोचे काम सुरू होणार आहे. मागील २५ वर्षांचा विकासाचा बॅकलॉग भरत असताना प्राथमिक सुख सुविधा पासून काम करावे लागले आहे. बस सेवेच्या माध्यमातून महिला भगिनीचा सुरक्षित प्रवास होणार आहे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

नगर एमआयडीसीतील श्री रेणुका माता मंदिर येथे नगर महापालिकेतर्फे एमआयडीसीतील कामगारांसाठी सिटी बस सेवेचा प्रारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाला. यावेळी अमी संघटनेचे माजी अध्यक्ष राजेंद्र कटारिया, सुमित लोढा, माजी नगरसेवक सागर बोरुडे, जल अभियंता परिमल निकम, मिलिंद कुलकर्णी, शंतनू गाडे, संजय बंदिस्ती आदींसह नागरिक उपस्थित होते.

रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढली असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था हीच सर्वात सुरक्षित आहे. कामगार वर्ग आपल्या कामावर येत असताना अपघाताच्या अनुचित घटना घडल्या आहेत त्यांच्या सुरक्षिततेसाठी आमदार संग्राम जगताप यांच्या कडे सिटी बस सेवेची मागणी केल्यानंतर त्यांनी तातडीने एमआयडीसीतील उद्योजकांचे प्रश्न मार्गी लावले. आमदार संग्राम जगताप हे शहराला पुढे घेऊन जाणारे नेतृत्व मिळाले आहे. सर्वांना बरोबर घेऊन काम करत असल्यामुळे आपले शहर पुढे जात आहे, असे त्यांनी सांगितले. उद्योजक राजेंद्र कटारिया यांनी कार्यक्रमाची प्रस्तविक केले. उद्योजक सचिन पाटक यांनी आभार मांडले.

# नगरजिल्ह्यात शस्त्रबंदीव जमावबंदी लागू

## जिल्हादंडाधिकाऱ्यांचे आदेश




**नगर : प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनीमुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये ७ ऑक्टोबरपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे.**

हा आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, लग्न मिरवणुका किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना सभा अगर मिरवणुका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# पिचड पितापुत्रांनी घेतली शरद पवारांची भेट

## तुतारी हाती घेण्याची शक्यता | नगर जिल्ह्यात भाजपाला मोठा धक्का



**मुंबई : प्रतिनिधी**

**भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते मधुकर पिचड हे पुन्हा एकदा शरद पवार यांच्या गटामध्ये प्रवेश करणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या संदर्भात मधुकर पिचड आणि त्यांचे चिरंजीव वैभव पिचड यांनी शरद पवार यांची भेट घेतली. पवारांच्या सिल्वर ओक या निवासस्थानी पिचड पितापुत्र आणि पवार यांच्या अर्धा तास चर्चा झाली. नगर जिल्ह्यात हा भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का मानला जात आहे.**

विधानसभा निवडणूक जवळ आल्याने अनेक राजकीय नेते मंडळी इतर पक्षात प्रवेश करत असल्याचे दिसून येत आहे. आपापल्या मतदारसंघात असलेले सोयीचे राजकारण आणि तिकीट मिळण्याची शक्यता, यावरही पक्षप्रवेश सुरू आहेत. त्यातच नगर जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

भाजपचे ज्येष्ठ नेते मधुकर पिचड आणि त्यांचे चिरंजीव वैभव पिचड यांनी शरद पवार यांची भेट घेतली. सध्या पिचड कुटुंब हे भाजपमध्ये असले तरी ते लवकरच शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करून तुतारी हातात घेण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे. या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जात आहे.

मधुकर पिचड यांनी शरद पवार यांची भेट घेण्याची पहिली वेळ नाही. याआधी देखील त्यांनी शरद पवार यांची भेट घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याची इच्छा व्यक्त केली होती. २०१९ च्या निवडणुकीत वैभव पिचड यांनी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला होता. यावेळी राष्ट्रवादीचे किरण लहामटे यांनी वैभव पिचड यांचा पराभव केला होता. मात्र आता वैभव पिचड यांचा शरद पवार गटात प्रवेश झाल्यास नगर जिल्ह्यातील राजकीय वातावरण बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

# टाकळी हाजीची चित्रा घोडे झाली पोलिस उपनिरीक्षक



टाकळी हाजी (ता. शिरूर, जि. पुणे) येथील सुकन्या चित्रा सुखदेव घोडे या शेतकरी परिवारातील मुलीने अथक परिश्रमाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण केली. आता तिची पोलिस उपनिरीक्षक पदी निवड झाली आहे. बिकट पारिवारिक स्थितीतून तिने मिळविलेल्या यशाबद्दल आपण तिचे कौतुक केले पाहिजे.

निघोज येथील मळगंगा कॉम्प्युटर्स यांच्यातर्फे चित्रा घोडे हिचा पोलिस उपनिरीक्षकपदी निवड झाली म्हणून सत्कार करण्यात आला. त्यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष, बबन सोनवणे (संचालक, कौस्तुभ कोचिंग क्लासेस, निघोज) बोलत होते.

चित्रा घोडे हिचे शिक्षण टाकळी हाजीच्या भैरवनाथवाडी, माळवाडीच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले. माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण निघोज येथे झाले. याआधी टाकळी हाजी गावच्या पाच मुली पोलिस उपनिरीक्षक झालेल्या आहेत. ही विशेष बाब म्हणावी लागेल.

या कार्यक्रमाला दिलीप सोनवणे (सेवानिवृत्त डीवायएसपी), मळगंगा पतसंस्थेचे संचालक मुकुंद निघोजकर, मळगंगा कॉम्प्युटर्सचे संचालक यश शेटे, एकनाथ शेटे, सुनिता ढवण, मॅनेजर लक्ष्मीनारायण पतसंस्था, प्रतिभा लाळगे, प्रतिमा गुंड, प्रवीण कवाद, महेश निचित, सृष्टी शेटे, संकेत पठारे, सानिका वरखडे आणि विश्वकर्मा बॅचचे विद्यार्थी उपस्थित होते.

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय (सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांवर नियंत्रण) हे आपल्या पोलिस दलाचे घोषवाक्य आहे. ते चित्रा घोडे सदैव लक्षात ठेवीन अशी आशा बाळगूया आणि आपणही तिचे अभिनंदन करूया.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,जि. अहमदनगर.**

### बदलापूर अत्याचार प्रकरणातील आरोपीचा एन्काऊंटर?

#### बंदूक हिसकावून पोलिसांवर गोळीबार



**बदलापूर : प्रतिनिधी**

**बदलापूरमध्ये दोन अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदेचा मृत्यू झाला आहे. त्याने पोलिसांची बंदूक हिसकावून त्यांच्यावर गोळीबार करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा पोलिसांनी स्वसंरक्षणासाठी त्याच्यावर गोळीबार केल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेत एका पोलीस कर्मचाऱ्यालादेखील गोळी लागल्याची सूत्रांची माहिती आहे.**

अक्षय शिंदे याची बदलापूर अत्याचार प्रकरणात एसआयटीकडून चौकशी सुरू आहे. त्याला कोठडीही देण्यात आली होती. त्यामुळे त्याला तळोजा तुरुंगात ठेवण्यात आलं होतं. मात्र, आणखी एका गुन्ह्यात त्याला ताब्यात घेण्यासाठी बदलापूर पोलीस आज तळोजा येथे आले होते. अक्षयचा ताबा घेऊन त्याला बदलापूरकडे नेत असताना ठाण्याच्या हद्दीत अक्षयने पोलिसांच्या हातून बंदूक हिसकावून पोलिसांवर गोळीबार केला. त्यामुळे पोलिसांनी त्याच्यावर सेल्फ डिफेन्ससाठी गोळीबार केला. त्यात त्याचा मृत्यू झाला, अशी माहिती समोर येत आहे.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2

डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. २९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी / अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच

मेजर भगवान नांगरे सर
✻ आमची वैशिष्ट्ये ✻
✻ १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
✻ एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
✻ प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
✻ मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
✻ अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
✻ PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
✻ पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
✻ ॲडमिशन ओपन ✻
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# जालिंदर वाबळेंचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

## आदिवासी महिलांना साडी व शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप



**वासुंदे : प्रतिनिधी**

**जोगेश्वरी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन सामाजिक कार्यकर्ते जालिंदर वाबळे यांचा वाढदिवस अनावश्यक खर्च टाळून साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्ताने वासुंदे येथील ठाकरवाडी, बोकनकवाडी, लाखेवस्ती, शिक्री या परिसरातील आदिवासी महिलांना साडी वाटप करण्यात आले.**

गावातील वासुंदे गावठाण, बोकनकवाडी, लाखेवस्ती, ठाकरवाडी, वाबळे वस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. वाढदिवसानिमित्त होणारा खर्च टाळून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. न्यू इंग्लिश स्कूल वासुंदे विद्यालयातील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप प्रसंगीच बांधकामासाठी आर्थिक मदत यावेळी जालिंदर वाबळे यांनी केली.

यावेळी वासुंदे येथे कार्यक्रम प्रसंगी उद्योजक अशोक खराबी, मोहनराव रोकडे, संदीप रांधवन, संदीप खराबी, दत्तात्रय साळुंके, गणेश शिरतार, भाऊसाहेब जेडगुले, अमोल उगले, पप्पू दाते, नामदेव हिंगडे, किरण पोपळघट, गणेश गिरी, संदीप झावरे, जगदीश पाटील गागरे, संतोष बागुल, संतोष शेलार, संदीप शेलार, कैलास नऱ्हे, बाळासाहेब पाटील, बाळासाहेब दातीर, प्रकाश चिकणे, नवनाथ आंधळे, संतोष आंधळे, विलास आंधळे, माऊली ठुबे, पप्पू गुंड, दौलत टकले, कुशाबा झिटे, अशोक पाटोळे, रामदास झावरे, प्रसाद झावरे, निखिल दाते, अर्जुन शिर्के, मच्छिंद्र वाबळे, भाऊसाहेब वाबळे, सुभाष केदार, बाळू केदार, जनार्दन केदार, रामदास मधे, तुळशीराम मधे, मनोहर गांगड, संजय केदार, भाऊसाहेब केदार, दादाभाऊ मधे, संतोष मधे, ठकाजी चिकने, सुरेश चिकने, पोपट दुधावडे, देवा गांगड, सोमनाथ केदार, सिताराम केदार, विठ्ठल दुधावडे, बाळासाहेब मधे, रावसाहेब वारे, सोनबा केदार, बबन केदार, सुनील केदार, सखाराम केदार, गिरजू मधे, सुनील केदार, किसन मधे, लखन केदार, हेमंत मधे, पोपट केदार, किसन धरम, जाधव सर, सावकार गांगड, लक्ष्मण चेमटे, धोंडीभाऊ ठुबे, प्रल्हाद भालेकर, शोभा खराबी, राजेंद्र दाते, संतोष क्षीरसागर, आदी उपस्थित होते.

# कठोर मेहनत आणि सातत्यातून ध्येय गाठले!

## आर्यन मॅन जय पोटेने उलगडले यशाचे रहस्य । किसान स्कुलमध्ये यशने साधला संवाद

**पारनेर : प्रतिनिधी**

**आर्यन मॅन स्पर्धेमध्ये यश संपादन करताना कठोर मेहनत केली, कामगिरीमध्ये सातत्य ठेवले आणि यशाला गवसणी घालीत ध्येय गाठल्याचे जागतीक स्तरावर नेत्रदिपक कामगिरी करणाऱ्या जय पोटे याने सांगितले.**

आर्यन मॅन स्पर्धेमध्ये कामगिरी करणाऱ्या जय पोटे याने किसान स्कुलमध्ये विद्यार्थी व पालकांशी संवाद साधला. जागतिक पातळीवर पारनेरचा डंका वाजविल्याबद्दल किसान परिवाराच्या वतीने त्यांना सन्मानही करण्यात आला. यावेळी किसानचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे, डॉ. राम पोटे, डॉ. संजीवनी पोटे, प्रकाश कांबळे, कुणाल पोटे, ऋषीकेश चेडे, प्रिन्सिपल राठोर यांच्यासह विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

यावेळी बोलताना जय पोटे याने सांगितले की, कठोर मेहनत करण्याचा निर्धार करून, प्रयत्नांतील सातत्य व ध्येय निश्चित करून या स्पर्धेत सहभाग नोंदविला. मागे वळून न पाहता यश-अपयशाच्या पायऱ्या चढत ध्येयापर्यंत मी पोहचलो. तुम्हीही एखादे टार्गेट सेट केल्यानंतर सातत्यपूर्ण प्रयत्न केले पाहिजेत असा संदेश जय याने दिला. प्रिन्सिपल राडोर यांनी प्रास्ताविक केले तर ऋषीकेश औटी यांनी आभार मानले.



आर्यन मॅन स्पर्धेत यश मिळविणाऱ्या जय पोटे याने किसान स्कुलमध्ये विद्यार्थी आणि पालकांशी संवाद साधला.

### १५ तास १५ मिनिटांत स्पर्धा पुर्ण

आर्यन मॅन स्पर्धा जय पोटे याने १५ तास व १५ मिनिटांमध्ये पुर्ण केली. त्यात १८० किलोमिटर सायकलिंग, ४२ किलोमिटर धावणे, १५ किलोमिटर चालणे अशी कामगिरी करत जगात २२ वा क्रमांक मिळविला.


### जिद्द आणि चिकाटी यशाची गरूकिल्ली

जिद्द आणि चिकाटी ही यशाची गुरूकिल्ली असून या गोष्टी जीवनात आत्मसात केल्या तर जगातील कोणतेही लक्ष्य अवघड नाही.जय याची कामगिरी निश्चितच कौतुकास्पद असून किसानच्या विद्यार्थ्यांनी त्यातून प्रेरणा घेऊन शिक्षण आणि क्रिडा क्षेत्रात लौकिक मिळविण्यासाठी प्रयत्नांमध्ये सातत्य ठेवावे. मेहतन केली तर त्याचे फळ निश्चित मिळते याचे उत्तम उदाहरण म्हणजे जय पोटे हे आहे.

**चंद्रकांत चेडे**
अध्यक्ष, किसान बहुउददेशिय संस्था

# डॉ. सुनिल कदम महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित

## शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते गौरव



मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात महाराष्ट्र रत्न पुरस्कार देऊन राज्याचे शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांच्या हस्ते डॉ. सुनिल कदम यांना सन्मानित करण्यात आले.

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील वात्सल्य हॉस्पिटलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुनिल विष्णू कदम यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार देऊन राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.**

यावेळी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूरचे अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, प्रसिद्ध सरकारी वकील उज्ज्वल निकम, डॉ.वैदेही तामण आदी तसेच मुंबई व परिसरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.कदम यांचे पारनेर तालुक्यातील वात्सल्य हॉस्पिटल असून बालरोग तज्ञ म्हणून त्यांचा पुणे व नगर जिल्ह्यात नावलौकिक आहे. गेली वीस वर्षांपासून वैद्यकीय व्यवसाय करताना त्यांनी सामाजिक , धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. कोरोना काळात दररोज नियमितपणे वैद्यकीय सेवा देत अनेकांवर कोरोना उपचार करीत त्यांनी अद्वितीय काम केले आहे. गेली आठ वर्षात दिल्ली, मुंबई या ठिकाणच्या विविध सामाजिक व सेवाभावी संस्थांनी पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

डॉ. सुनील कदम यावेळी म्हणाले, गेली अनेक वर्षांपासून आपण वैद्यकीय व्यवसाय करताना रुग्णांना अल्पदरात सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे. आपले शिक्षण जरी मुंबई व ईतर शहरात झाले असले तरी आपण पारनेर तालुक्यातील पिंपरी जलसेन येथील असल्याने सुट्टिच्या काळात आपण निघोज व पारनेर तालुक्यातील गावांत सातत्याने येत होतो ग्रामीण भागातील जनतेची सेवा करण्याचा आपला संकल्प होता. आई वडील, पत्नी,मुलगा मुलगी यांचे सातत्याने मिळणारे पाठबळ माता मळगंगा देवीचा आशीर्वाद,समाजाचे प्रेम यामुळे आपण वैद्यकीय व्यवसायात यशस्वी झालो असून सामाजिक कामांची आवड असल्याने पुरस्कार मिळत गेले असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

# मुलिकादेवी विद्यालयाचा सुमित बरशिले जिल्हास्तरावर

## मैदानी स्पर्धेत विद्यालयाच्या खेळाडूंची कामगिरी



**निघोज: प्रतिनिधी**

**पारनेर महाविद्यालयात पार पडलेल्या तालुकास्तरीय मैदानी क्रिडा स्पर्धेत श्री मुलिकादेवी विद्यालय निघोज येथील सुमित प्रवीण बरशिले याने १९ वर्षे वयोगटात दिडहजार मीटर व ४०० मीटर धावणे या क्रीडा स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला आहे.या खेळाडूची जिल्हा पातळीवर निवड झाली आहे.**

सुमित बरशिले १०० मी व परवेज सुलतान तांबोळी याने २०० मी धावण्याच्या स्पर्धे त तृतीय क्रमांक मिळवला आहे .तसेच १९ वर्षे वयोगट ४१०० आणि ४४०० रिले या खेळात प्रथम क्रमांक मिळवला आहे या खेळ प्रकारामध्ये वेदांत वरखडे,शिवा प्रजापती, सुमित बरशिले, आर्यन सालके, परवेज तांबोळी, या खेळाडूंनी उत्तम कामगिरी करून यश संपादन केले आहे. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेचे अध्यक्ष रा.ह दरे ,सचिव विश्वासराव आठरे ,ज्येष्ठ विश्वस्त मा.आ .नंदकुमार झावरे, सीताराम खिलारी ,प्राचार्य के.बी. शिंदे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक बी.एस.शिंदे,इनामदार सर,गुंजाळ सर,बारामते सर,गोरखे सर,आवारी सर,वराळ मॅडम पोटे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

# सामाजिक बांधिलकी जपत मातोश्रीचा वाढदिवस!

## चोंभूतच्या ज्येष्ठ मातापित्यांचाही सन्मान
## शतकोत्तर वयाच्या आजीसाठी १११ दिवे प्रज्वलीत

**चोंभुत : प्रतिनिधी**



**गावातील नरवडे कुटुंबातील मातोश्री श्रीमती झुंबराबाई रखमा नरवडे यांचा १११ व्या वाढदिवसानिमित्त गावात विविध उपक्रम राबवण्यात आले. याप्रसंगी गावातील ज्येष्ठ मातापित्यांचा सन्मान करीत या परिवाराने सामाजिक बांधिलकी जपली आहे.**

दुपारी संगीतमय भजन सायंकाळी ह.भ.प.पांडुरंग महाराज शितोळे यांचे कीर्तन संपन्न झाले.वाढदिवस साजरा होत असताना नरवडे कुटुंबाने एक अनोखा उपक्रम केला सामाजिक बांधिलकी जपत गावातील ज्येष्ठ नागरिकांचा, मातांचा सन्मान करण्यात आला,ज्येष्ठांना फेटे बांधून तर मातांना चोळी पातळ देऊन सन्मानित करण्यात आले.

आजींसाठी १११ दिवे प्रज्वलित करून आजींच्या २ मुली,१सून आणि २ नाती यांनी आजींचे औक्षण केले. यावेळी चोंभुत गावातील गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते हा कार्यक्रम सामाजिक सलोख्यातून होत असताना यावेळेस पाहायला मिळाला.

हभप.शितोळे महाराज यांनी यावेळी आरोग्य शक्ती आणि जीवनामध्ये जगत असताना कोणते मार्ग निवडावे त्यातून पुण्य कसे कमवायचे यावर कीर्तन केले तसेच यावेळी मोठ्या संख्येने आजींच्या कुटुंबातील नातेवाईक उपस्थित होते. यावेळी निघोजचे सोमनाथ वरखडे यांनी आजींना शुभेच्छा दिल्या तसेच शेळके ग्रुप ऑफ कंपनीचे चेअरमन बबनराव शेळके हे तसेच महादूशेठ गोरडे आणि ग्रामस्थ उपस्थित होते. अभिष्टचिंतन सोहळ्यानंतर स्नेह भोजनाचे देखील आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे निवेदन नीलेश पडवळ व ग्रामपंचायत सदस् प्रनल भालेराव यांनी केले.

# फ्रीडम पॉवर पत्रकार संघाचे चौरे प्रदेशाध्यक्ष

## बाजीराव खांदवे यांनी दिले नियुक्तीपत्र

**पारनेर : प्रतिनिधी**

**दै. मराठवाडा साथी वृत्तपत्राचे तालुका प्रतिनिधी श्रीकांत चौरे यांची महाराष्ट्र राज्य फ्रीडम पॉवर पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. संघाचे अध्यक्ष बाजीराव खांदवे यांनी चौरे यांना नियुक्तीपत्र दिले. त्यांच्या निवडीबद्दल खासदार नीलेश लंके यांनी त्यांचा सत्कार केला.**

चौरे यांनी पत्रकारिता करताना विविध विषयांवर लिखाण करून अनेक ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडली आहे. मागील वर्षी यांच्या या कामाची दखल घेऊन पत्रकारितेतील जीवन गौरव पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले होते. पत्रकारितेतील त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना प्रदेशाध्यक्षपदावर काम करण्याची सांधी देण्यात आल्याचे बाजीराव खांदवे यांनी सांगितले.

पत्रकारांच्या हितासाठी, त्यांच्या हक्कासाठी राज्यस्तरावर व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य फ्रीडम पॉवर पत्रकार संघ काम करत आहे. राज्यात काम करत असताना पत्रकारांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. अनेकदा प्राणघातक हल्लेही होतात. राज्यभरातील पत्रकारांच्या



महाराष्ट्र राज्य फ्रीडम पॉवर पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी श्रीकांत चौरे यांची निवड झाल्याबद्दल खा. नीलेश लंके यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

पाठीशी खंबिरपणे उभे राहून त्यांना न्याय देण्यासाठी या संघटनेची स्थापना करण्यात आल्याचे संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दीपक मेढे, अध्यक्ष बाजीराव खांदवे यांनी सांगितले.

संघटनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये निष्ठेने सहभाग नोंदवून या पदाला न्याय देणारी व्यक्ती म्हणून एक वर्षांच्या कालावधीसाठी चौरे यांची नेमणूक करण्यात आली आहे. वर्षभरातील कार्य अहवालाची दखल घेऊन पुढील मुदतवाढीचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे बाजीराव खांदवे यांनी सांगितले.

# देवीभोयरे येथे नवरात्रोत्सवाची लगबग

## महोत्सवाचे ४७ वे वर्ष । भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन

**देवीभोयरे : प्रतिनिधी**

**नवरात्रीनिमित्त राज्यातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या देवीभोयरे येथील श्री अंबिकामाता मंदिरात आयोजित करण्यात येणाऱ्या नवरात्र महोत्सवाची लगबग सुरू झाली असून दहा दिवस भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

विद्यमान सरपंच अशोक मुळे, अंबिका माता देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शिवाजीराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या महोत्सवासाठी खासदार नीलेश लंके यांचेही सहकार्य लाभणार असून विविध कार्यक्रमांसाठी त्यांचे मार्गदर्शन घेण्यात येणार आहे.

३ ते १२ ऑक्टोबर दरम्यान साजऱ्या होणाऱ्या ४७ व्या नवरात्रोत्सव समितीच्या अध्यक्षपदी देवीभोयरे गावाचे उपसरपंच दत्तात्रय शंकर मुळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. कार्याध्यक्षपदी अक्षय राजाराम बेलोटे, उपाध्यक्षपदी संदेश सुभाषराव बेलोटे, सोशल मिडिया प्रमुखपदी विनोद साळवे यांची निवड करण्यात आली.

### विविध कार्यक्रमांचे आयोजन

यंदा विविध सांस्कृतिक डान्स अकॅडमीचे खेळ पैठणीचा शाहिरी पोवाडा, देवीच्या गीतांचा कार्यक्रम, किर्तन, ऑर्केस्ट्रा, जनजागृती कार्यक्रम आदी कार्यक्रमांचे दहा दिवस आयोजन करण्यात आले आहे.

### जुना आणि मोठा नवरात्रोत्सव

मुंबईकर, पुणेकर ग्रामस्थ तसेच अनेक भाविक भक्त यांच्या लोकवर्गणीतून मोठया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून तो यशस्वी करण्यासाठी नियोजन समिती प्रयत्नांची परीकाष्टा करत आहे. नवरात्र काळात लाखो भाविक देवीच्या दर्शनासाठी येतात. नवरात्र कमिटी, देवस्थान ट्रस्ट, ग्रामपंचायत या सर्वांच्या एकत्रीत नियोजनातून हा यात्रा महोत्सव अतिशय आनंदात संपन्न होतो. जिल्हयातील सर्वात जुना आणि मोठा नवरात्रौत्सव म्हणून आमच्या देवीभोयरे गावाच्या उत्सवाची ओळख आहे.

**जितेश सरडे**
प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस आय टी सेल



'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com